Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतातील स्त्री चळवळी दशा व दिशा

प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. भारतीय लोकशाहीचा इतिहास तसा फार जुना आहे. परंतु 1947 च्या स्वातंत्र्यानंतर प्रामुख्याने 1952 च्या पाहिल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीनंतर लोकशाहीचा प्रारंभ झाला. भारतीय लोकशाही स्त्री आणि पुरुष या दोन महत्वाच्या चाकावर उभी आहे. यातील स्त्री नावाचे चाक अनादीकाळापासून समाजाचे व कुटूंबाचे सर्व ओझे वाटत आहे. पुरुषप्रधान व्यवस्था, धर्म आणि धर्ममार्तंडानी याच चाकाला ब्रेक लावले. ज्यामुळे पुरुषांना वर्चस्व, सुरक्षित व जीवन व्यवस्थित जगता येते. स्त्री हा समाज, कुटूंब व राष्ट्राच्या महत्वाचा घटक आहे. तिच्याशिवाय राष्ट्र नावाचे जहाज व्यवस्थित प्रवाहीत होणार नाही. यांची जाण सर्वच शासनकर्ते, विचारवंत, प्रशासनकर्ते यांना आहे. स्त्री सहभाग भारतीय लोकशाहीला नव संजीवनी व नव उभारी देणारा आहे.

लोकशाही आणि स्त्री यांचे अतुट नाते आहे. तरी भारतीय लोकशाहीत स्त्रीला तिचे हक्क मिळविण्यासाठी झगडावे लागते. या संघर्षाने आज चळवळीचे स्वरुप धारण केले. भारतात स्त्री चळवळीचे लोक चळवळीचे स्वरुप धारण केले. 19 व्या व 20 व्या शतकात भारतीय स्त्रियांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय, मानवी हक्क, राजकीय चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. स्त्रीयांच्या सामाजिक व इतर चळवळीतील वाढत्या सहभागाने. भारतीय समाजातील वाढत्या सामाजिक अंतर्गत विरोधला स्पष्ट केले. भारतात स्वातंत्र्यानंतर स्त्री चळवळीला पोषक वातावरण उपलब्ध झाले. त्यातही 21 व्या शतकातील वातावरण अधिक चांगले आहे. तरीही अपेक्षेप्रमाणे या चळवळीला गती मिळत नाही. एक स्वतंत्र ओळख न मिळाल्याने या चळवळीला अनेक संकटांचा सामना करावा लागतो. या संकल्पना ओळखण्याची क्षमता या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वात आहे का ? याशिवाय प्रतिगामी, रुढीवादी व सांप्रदायिक शक्ती महिलावर दबाव आणून ही चळवळी मोडीत काढण्याचा प्रयत्न करत आहोत. याशिवाय महिला चळवळीच्या गतीला ब्रेक लावण्यात वर्तमान राजकारणाचा वाटा अधिक आहे. भारतीय राजकारणातील वैचारीक व राजकीय संकटाने स्त्री चळवळीला पुर्णतः प्रभावित केले. भारताच्या तुलनेत युरोपीयन राष्ट्र, अमेरिका, या देशातील भांडवलवादाचा विकासासोबत कुटूंबाच्या संरचनेत झालेल्या बदलामुळे समान हक्कासाठी स्त्री चळवळीचा उदय झाला. जगाचा इतिहास पाहता हे लक्षात येते की, युरोपीयन राष्ट्रसह अमेरिका व इतर देशातील भांडवलवादाच्या विकासानेच स्त्री चळवळीला उभारी दिली. भारताबाबत मात्र हे विधान पुर्णतः लागु पडणार नाही. स्त्री चळवळ आर्थिक राजकीय संघाचा एक भाग आहे. 19 व्या आणि 20 व्या शतकात स्त्री चळवळ राजकीय अधिकाराच्या प्राप्तीसाठी झाली.

परिणामातः या चळवळीने समाजाला प्रभावित करुन स्त्रीयांना कायदेशीर अधिकार मिळून दिले सामान्यतः महिलांचे शोषणाशी संबधित अंतविरोध परस्परपुरक आहे. त्यामुळे स्त्री मुक्ती संघर्ष साम्राज्यवाद व त्याच्या शक्तीच्या विरोधी संघर्षाचा एक भाग आहे.

भारतात स्त्री मुक्तीचा प्रश्न भारतीय समाजातील क्रांतीकारी पतिवर्तनाशी संबधित आहे. भारतीय स्त्रीला समाजात मुलभुत अधिकार दिले नाहीत. भारतात स्त्रीचे पितृसत्ताक व्यवस्थेतून होणारे शोषण, तिची आर्थिक परावलंबन पुरुषांच्या स्वाधीन जीवनप्रणालीमुळे भारतीय अर्थव्यवस्था विकासाची गती होत नाही. तर उपभोगवादी

संस्कृतिने यात आणखी भर टाकून स्त्री जीवनात अंधकार व शोषणाचे प्रमाण वाढवले. भारतीय पुरुषप्रधान समाज, राज्यव्यवस्था, भांडवलदार, सरंजामदारी, शासक वर्ग, जातिवर आधारीत सामाजिक संबंधाचे समर्थक व रक्षक आहेत. याशिवाय त्यांना भारतीय अर्थव्यवस्थेवरील स्वतःची पकड मजबूत करता येत नाही. अशाच प्रकारची व्यवस्था कायम रहावी. म्हणून राज्य यंत्रणेचा हत्यार म्हणून वापर प्रस्थापित पुरुषप्रधान व्यवस्था व मानसिकतेकडून केला जातो. परिणामतः स्त्री चळवळीला मजबुत करुन स्त्रीयांची मुक्ती करण्यासाठी या चळवळीला लोकचळवळ बनवावे लागेल. यासाठी शासक व त्यांच्या सत्तेच्या विरुध्द संघर्ष करावा लागेल.

**स्वातंत्र्यापुर्वीची स्त्री चळवळी :**

भारताच्या समाजिक व राजकीय जीवनातील स्त्रीयाचा सक्रिय सहभाग गांधी युगापासूनचा आहे. महात्मा गांधीमुळेच स्त्रीयांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. परंतु स्त्री शोषण, अन्याय,अत्याचार याविरुध्द स्त्री संघर्षाचा प्रारंभ 1920 पुर्वीच झाला. स्वातंत्र्या अगोदर भारताच्या विविध भागात समाज सुधारणेच्या चळवळीला प्रारंभ झाला. प्रामुख्याने या काळातील ब्रिटीश शासन व्यवस्थेची उदारमतवादी व लोकशाही मुल्य, तरणांच्या वाढता सुशिक्षित वर्गाने या सामाजिक सुधारणांना खतपाणी घातले स्वातंत्र्यापुर्वीचा स्त्री चळवळीचा विचार वर्तमानातील स्त्री चळवळीच्या स्वरुप व व्याप्तीला समजून घेण्यासाठी करणे क्रमप्राप्त ठरेल.

19 व्या शतकातील सुधारणावादी चळवळीचा मुख्य उद्देश कायदा व सामाजिक मार्गाने स्त्रीयांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा होता. परंतु या सर्व चळवळीचे नेतृत्व पुरुष करत होते. याला अपवाद म्हणजे पंडित रमाबाई होय. पंडिता रमाबाईनी आपल्या कुटूंबाची मदत न घेता स्त्रीयांचे शिक्षण, विधवा विवाह व आवास गृहाची स्थापना केली. वर्धमान महावीर, महात्मा गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वरासह राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर आगरकर, रानडे,या सर्वाचा स्त्रीयांप्रति सुधारणावादी व सकारात्मक दृष्टिकोन होता. सतीप्रथा, विधवा पुर्नविवाह, स्त्री शिक्षण व बाल विवाहास विरोध केला. परंतु यातील सर्वच सुधारक उच्चवर्णीय होते. त्यांच्या सुधारणांचा प्रभाव उच्च जातीतील स्त्रीयांवरच पडत होता. त्याकाळातील रुढीवादी वर्गाने या सुधारणांना विरोध केला. सुधारकांना सामाजिक बहिष्कारापासून अनेक शारिरीक यातना सहन कराव्या लागल्या. स्त्री सुधारणेशी संबंधित पहिल्या टप्यातील उदारमतवादी सुधारक उच्च वर्णीय जातीय वर्गीय होते. त्यामुळे ते हिंदु व्यवस्थेने समर्थन केलेल्या जात व्यवस्था, पितृसत्ताक व्यवस्था व परंपरेचा विरोध करण्यात धजावत नसत. परिणामतः स्त्री सुधारणा बोथट बनत. परंतु नंतरच्या काळात स्वामी दयानंद सरस्वतीचा आर्य समाज, स्वामी विवेकानंदाचे रामकृष्ण मिशन ई. काही आधुनिक स्वरुपातील सुधारणांचे समर्थन केले. ज्यामुळे महिलामध्ये आत्मसन्मान, मनुष्यत्व, हक्क याबाबींविषयी जागरुकता वाढली. परिणामतः 1927 ला राष्ट्रीय स्तरावर ऑल इंडिया वुमेन्स कॉंफ्रन्सचा जन्म झाला. या संस्थेला दिशा देण्यासाठी स्वयंप्रेरणेने काही स्त्रीया पुढे सरसावल्या या महिलांनी हिंदु पर्सनल लॉ पुर्णतः बदलण्याची मागणी केली. हिंदु कोड बिलाच्या प्रचारात सक्रिय योगदान या संघटनेने दिले तर भारतीय राष्ट्रीय कॉंगेस याचा विरोध करत होतो. या संघटनेला या देशातील प्रतिगामी व रुढीवादी शक्तींचा सामना अनेक प्रकरणात करावा लागला उदा : हिंदु कोड बिल.

भारतीय स्त्रीयांना सामाजिक व राजकीय क्षेत्रात अधिक सक्रिय होण्यास महात्मा गांधीनी प्रोत्साहित केले. स्त्रीयांच्या सन्मान व प्रतिष्ठेला महत्व देणाऱ्या रामराज्यांची संकल्पना मांडली. या रामराज्यात स्त्रीरुपी प्रतिमा म्हणून सीतेला अधोरेखित केले. महात्मा गांधीनी कुटूंबातील स्त्रीवरच्या पतीच्या वर्चस्वाला विरोध केला. परंतु हिंदु समाजातील कुटूंबाच्या पारंपारिक संरचनेला विरोध केला नाही. महात्मा गांधीनी महिलांनी घरी राहून सुत कताईचे कार्य करण्यास प्रेरित केले. या काळात महिला राष्ट्रभक्तीच्या विचाराने प्रेरित झाल्या. रस्त्यावर येवुन त्या प्रभात फेरी काढून राष्ट्रभक्तीपर गीत गावु लागल्या. परदेशी कपडे व दारुच्या दुकानाविरुध्द संघटित होवून चळवळ उभी करु लागल्या. अशा प्रकारे महिलांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान दिले होते. महात्मा गांधीच्या नेतृत्वात महिला स्वातंत्र्य चळवळीच्या रुपाने सार्वजनिक जीवनात सक्रिय झाल्या. परंतु यांच्यातील अधिकार स्त्री या उच्च वर्गातील

होत्या. गांधीवादी चळवळीने स्त्रीयात जागृती घडवली. परंतु तिचे स्वरुप सार्वत्रिक नव्हते. याउलट महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुलेची सत्यशोधक समाजाची चळवळ, तामिळनाडूतील रामसामी पेरियांराची चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दलित चळवळीने ब्राह्मण्यवाद जाति व्यवस्था. पितृसत्ताक व्यवस्थेला आव्हान दिले. फुल्यांनी रुढीवादयांचा प्रखर विरोध स्विकारुन मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरु केली. फुल्यांनी स्वतः एका अस्पृश्य मुलाला दत्तक घेतले. विधवांवर होणाऱ्या अत्याचाराविरुध्द पुण्यात न्हाव्याच्या उपोषणाचे आयोजन केले. स्त्रियांचा खालावणाऱ्या स्थितीची कारणे व त्या सुधारण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपायावर फुलंनी आपल्या खंडातून प्रभावी लिखान केले. तर तामिळनाडुत अशाच प्रकारची सुधारणा रायसामी पेरियार यांनी केली.

या चळवळीशिवाय मध्ययुगीन काळातील महात्मा बसवेश्वरांची स्त्री सुधारणा चळवळ महत्वाची आहे. किंबहुना मध्ययुगातील महात्मा बसवेश्वरांची स्त्री सुधारणा चळवळ आधुनिक व वर्तमानकाळातील स्त्री सुधारणा चळवळीचा पाया आहे. बसवण्णांचा गृहत्यागापासुन ते अनुभवमंटपातील आंतरजातीय विवाहपर्यंतची सर्व घटना स्त्री सन्मानाने ओतप्रोत भरलेल्या आहेत. बसवण्णांचा जन्मच स्त्रीच्या पायातील सर्व साखळदंडाना नष्ट करणारा आहे. स्त्री शिक्षण, स्त्री सन्मान, स्त्रीयांचे धर्म स्वातंत्र्य, विधवा विवाहास मान्यता, दासी प्रथेला विरोध, स्त्रीच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे समर्थन, निर्णय निर्धारणातील सहभाग ई. अनेक क्षेत्रातील स्त्रीयांच्या सन्मानास पोषक वातावरण बसवण्णांनी निर्माण केले. परिणामतः दक्षिणेकडील 12 वे शतक समतेचे युग बनले.

स्वातंत्र्याअगोदर या देशातील स्त्री चळवळीला जिवंत ठेवण्याची उर्मी या देशातील तरुण व तरुणीला ब्रिटीशांच्या विचारधारेतुन मिळाली. ती भारताच्या संपन्न व सक्षम ऐतिहासिक वारश्यातुनही मिळाली. तसेच 20 व्या व 19 व्या शतकातील युरोपमधील सुधारणांचा प्रवाह भारतात ब्रिटीशांच्या रुपाने येवु लागला. परदेशातील शिक्षण आणि लोकशाही प्रती भारतीयांचे वाढते प्रेम, दृढ श्रध्दा यामुळेही भारतात पारतंत्र्याच्या काळात अनेक स्त्री चळवळीचा उदय झाला. परंतु या पुर्णतः यशस्वी झाल्या असे म्हणता येणार नाही. परंतु त्यांनी स्त्री चळवळीचा पाया निश्चित घातला.

**स्वातंत्र्यानंतरची स्त्री चळवळी**

भारतातील स्त्री चळवळीच्या अभ्यासाचा दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे स्वातंत्र्यानंतरचा कालखंड होय. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या शासनाने स्त्रीयांच्या हित व कल्यासाणासाठी राजसत्तेचा आधार घेतला. त्यामुळे महिलांना शासकीय संस्थामध्ये नौकरीची संधी मिळाली हिंदु महिलांना संपत्ति, उत्तराधिकार विवाह, तलाक इत्यादी अनेक विषयाबाबतचे कायदेशीर अधिकार मिळू लागले. कायदयात सकारात्मक बदल केल्याशिवाय सुधारणा होणार नाहीत हा विचार स्वातंत्र्यानंतर पुढे आला 1960 व 70 च्या दशकातील दुष्काळ, महागाई, वाढता भ्रष्टाचार, राजकारणातील अस्थिरता, आणिबाणी इत्यादीने समाजात संघर्ष व विद्रोहाला खतपाणी घातले. तर दुसरीकडे याच काळात नक्षलवादी चळवळीचा जन्म झाला. या सर्व घटनाक्रमांचा संबंध महिलांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनाशी होता. त्यामुळे महिला पारंपारिक बंधनाना तोडून राजकीय घटनाक्रमात सहभागी झाल्या. याचकाळातील जयप्रकाश नारायणांच्या संपूर्ण क्रांती चळवळीत विद्यार्थीनी सहभागी झाल्या. या काळातील वाढत्या महागाई विरोधात प्रथमतः शहरी भागातील महिलांनी रस्त्यावर येवून आपला विरोध व राग व्यक्त केला. तर दुसऱ्या बाजुने महिलां शिक्षण व आधुनिकीकरणाच्या दिशेने अधिक आकर्षिल्या गेल्या. परिणामतः त्यांच्यात सकारात्मकता निर्माण झाली.

आणिबाणीच्या काळात झालेल्या अधिकाराच्या चळवळीने महिलांना सक्रिय होण्यास अधिक संधी दिली. भारतातल्या अनेक महत्वाच्या शहरात स्त्रीयांच्या स्थिती शोषणावर चर्चा करण्यासाठी स्त्री समुहाची स्थापना करण्यात आली. या समुहाने स्त्री सुधारणेच्या सैध्दांतिक व चळवळीच्या अंगावर अधिक लक्ष दिले. या संघटनांनी झोपडपट्टी, कामगार, शिक्षण या सर्व क्षेत्रातील महिलाबाबत काम केले. ग्रामीण भागात जमीनदारामार्फत स्त्रियावर होणारे लैंगिक अत्याचाराविरुध्द याच काळात चळवळी निर्माण झ ाली. तर स्त्रीयांच्या नावाने जमीन करावी हा मुद्दा याच काळात पुढे आला. तर आदिवासी महिलांनी दारुबंदीचे आंदोलन केले. अशा प्रकारे ग्रामीण व शहरी भागात

महिलांशी संबंधित मुद्दे सार्वजनिक स्वरुपात समोर आले. याच काळात घडलेल्या अनेक स्त्रीयांचे लैंगिक अत्याचाराने स्त्रीयांच्या लैंगिक शोषणाला सामाजिक मुद्दा बनवले. त्यावर एक विशिष्ट प्रकारची समज समाजात विकसित करण्याचे प्रयत्न केले. बलात्कार व फक्त वासनेशी सबंधीत मुद्दा नसुन ते स्त्रीविरोधात पुरुषी शक्तीचा होण्याच्या वापराचा मुद्दा आहे. 1980 च्या दशकात हुंडयामुळे स्त्रीयांचे होणारे शोषण, जाळपोळ, मुत्यु हे स्त्री चळवळीचा मुख्य मुद्दा होते. या निमित्ताने कुटूंबा अंतर्गत स्त्रियांचे होणारे शोषण व हिंसेकडे समाज व शासनाचे लक्ष वेधले. संपत्ती व इतर विषयाबाबत महिलांचे होणाऱ्या अन्यायाचे विश्लेषण व टिका याकाळात करण्यात आली. ज्यास प्रसार माध्यमांनी बरीच मान्यता दिली. या समुहांनी स्त्री चळवळीच्या स्वरुपात स्वतःची एक ओळख बनवली. या संघटनांनी स्वतःस जाणीवपुर्वक राजकीय पक्ष, राजकीय नेते, राजकीय समुह यांच्यापासून वेगळे ठेवले.

1960 च्या दशकात अनेक क्षेत्र व संघटनात महिलांच्या संघटित होण्याला अधोरेखित करण्यात आले. विविध कारखान्यात काम करणाऱ्या कामगार महिला, घरात घरकाम करणाऱ्या मजुर महिला आपापले प्रश्नासाठी संघटित होवून रस्त्यावर उतरल्या, कामगार महिलांच्या एक राष्ट्रीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना संघटित केले. तर अनेक राजकीय पक्षांनी स्वतंत्र स्त्री आघाडीची स्थापना केली. तर अनेक राजकीय पक्षांनी राजकीय क्षेत्रात महिलांचे समर्थन मिळविण्यासाठी महिला संघटनांना सक्रिय केले. परिणामतः अनेक भागात महिला संघटनाची स्थापना झाली. या संघटनांनी संकटातील महिलांना मदत करण्यासाठी अनेक संस्थांची निर्मिती झाली. या सर्वाचा परिणाम असा झाला की, शासनाच्या व परदेशी स्तरारील मदत घेवून महिलांच्या प्रश्नाबाबत संशोधनास प्रारंभ झाला. या संशोधनामुळे इतिहास, वर्तमान व भविष्यातील प्रत्येक घटना, संस्थाकडे स्त्रीवादी दृष्टीकोनातून पहाण्याचा विचार विकसित झाला. शितयुध्दाच्या शेवटच्या काळात या शहरी चळवळीचा परिणाम ग्रामीण भागात दिसू लागला. ग्रामीण स्त्रीयात जागृती निर्माण झाली. शेतकरी संघटनांनी हि महिलांच्या प्रश्नांना प्राधान्य देवून महिला संघटनांची स्थापना केली. उदा : शेतकरी महिला आघाडी, महिला आघाडी.

एका बाजुने स्वातंत्र्यानंतर भारतात महिला चळवळीला बळ प्राप्त होत होते. तर दुसरीकडे या चळवळी व संघटनाकडे पाहण्याचा राजकारणाच्या नकारात्मक दृष्टिकोन बनत होता. कारण या सर्व चळवळीमुळे महिलांनी समाज, शासन व प्रशासन स्तरावरील अनेक पदापर्यंत मजल मारली. ज्यामुळे पुरुषी सत्ता व मानसिकता चिंतीत बनली. पुरुषांच्या सत्ता स्थानास सुशिक्षित महिलांनी हस्तगत केले. महिलातील आपल्या भविष्याबाबतचा वाढता सकारात्मक दृष्टिकोन पुरुषी, मानसिकतेला. विशेषतः राजकारणाच्या नेतृत्वाला धक्का देणारा होता. असे होवू नये म्हणून राजकारण्यांनी आपल्या प्रचारात स्त्री प्रश्नाला प्राधान्य दिले. परिणामतः शासकीय नेतृत्वाकडून महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. शासन व राजकीय पक्षाच्या स्तरावर स्त्रीयांच्या नेतृत्वास संधी दिली. महिला पोलिस दलाचे संघटन करुन त्यात महिलांना सहभागी करुन घेतले. महिलांच्य सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षिणक, सांस्कृतिक, शारिरीक व मानवी हक्काशी संबंधित प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी शासनाकडून भरपूर निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. महिलानी प्रारंभ केलेल्या उद्योगधंदयाना सहकार्य दिले. ज्यामुळे हे व्यवसाय शासनाच्या नियंत्रणाखाली आले. महिलांशी संबंधित कायदे बनवण्यात आले. या कायदयात संशोधन संबंधित कायदे बनवण्यात आले. महिलांनी राजकीय प्रवेशाची संधी मिळावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थात (ग्रामीण व शहरी) 73 व्या व 74 व्या घटनादुरुस्तीने आरक्षणाची तरतुद केली. केंद्र व राज्य शासनाने ग्रामीण महिलांच्या विकासासाठी अनेक योजनांचा प्रारंभ केला. ज्यामुळे महिलांना शिक्षण मिळेल. तंत्रज्ञानातील कुशलता प्राप्त होईल. शासकीय योजनातील भागेदारी वाढेल. या सकारात्मक प्रयत्नासोबतच शासन यंत्रणा प्रसार माध्यम न्यायालयानी स्त्रियांचे शोषण, बलात्कारास प्रोत्साहन देणाऱ्या साधनांना खतपाणी घातले. मुस्लिम महिलांच्या सबलीकरणातील मुख्य अडथळा असणाऱ्या तीन तलाक बाबत सार्वजनिक चर्चा होून त्यास कायदयाच्या स्वरुपात लोकसभेत मांडण्यात आले.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VIII | ISSUE- VIII | AUGUST | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

**संदर्भ :**


1) पंचायत राज आणि महिला नेतृत्व डॉ. अजय पाटील - मैत्री प्रकाशन - लातूर -2011
2) मानवाधिकार एवं महिला ऐ-प्रकाश नारायण नाराणी - सबलाइम पब्लिकेशन्स जयपूर-2005
3) परिवर्तनाचा वाटसरु 16 ते 31 मे 2017
4) भारतीय प्रशासन - डॉ. वा.भा.पाटील - प्रशांत पब्लिकेशन्स-जळगाव- 2012
5) ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया - प्रा. लेफटनंट सुनिता बोर्डे- खडसे -प्रा.संतोष केशव , खडसे - शुभम पब्लिकेशन्स
6) उच्चतर आधुनिक राजकीय सिध्दांत - डॉ. एम.बी.फड - विद्याबुक्स पब्लिकेशर्स्, औरंगाबाद 2014


Dr. Mohan N. Khatal
Principal
A. V. Education Society's
Degloor College,Degloor Dist Nanded